# प्रेस नोट

## आंतरराज्यीय पोलीसांच्या उत्कृष्ट समन्वयामुळे पुण्यातील २ सनसनाटी दरोडे उघडकीस

सन २०१४ मध्ये पुणे शहरामध्ये कोरेगाव पार्क परिसरात असलेल्या पी एम जी ॲन्ड ज्वेलर्स कोरेगाव पार्क या ज्वेलरीच्या दुकानावर ३ अनोळखी इसम व १ महिला यांनी दागीने घेण्याचे बहाण्याने दरोडा टाकुन, दुकानातील कामगार यांना पिस्तुलाचा धाक दाखवुन १,४२,०००००/- रूपये (एक कोटी बेचाळीस लाख रूपये ) हि-याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेलेले होते, त्याबाबत कोरगाव पार्क पोलीस स्टेशन येथे गु र न १३३/१४ भा द वि क ३९३, ३९७,३५२,४२७,३४ आर्म ॲक्ट ३(२५) प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आलेला होता.

तसेच हडपसर येथे सोनीगरा ज्वेलर्स या दुकानावर ३ अनोळखी इसम यांनी दागीने घेण्याचे बहाण्याने दरोडा टाकुन, दुकानातील कामगार यांना पिस्तुलाचा धाक दाखवुन १४५० ग्रॅम किंमत रूपये ४०,०००००/- रूपये (चाळीस लाख रूपये ) सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेलेले होते, त्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे गु र न ५८३/१४ भा द वि क ३९३, ३९७,३५२,४२७,३४ आर्म ॲक्ट ३(२५) प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आलेला होता.

सदर दाखल गुन्हे हे दिवसा रिव्हॉल्वरचा धाक दाखवुन जबरी चोरी केल्याचे असल्याने सदर गंभीर स्वरुपाचे गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा मार्फत चालु होता त्यादरम्यान पोलीस उप आयुक्त श्री पंकज डहाणे यांना उत्तरप्रदेश स्टेट टास्क फोर्स यांचेकडून वरील नमूद गुन्हयातील मुळ सुत्रधार हे पुणे शहरामध्ये वडगाव शेरी व हडपसर या परिसरात राहणारे व मुळचे उत्तरप्रदेश येथील असणा-या दोन युवकांनी उत्तरप्रदेश येथील साथीदारांसह कोरेगाव पार्क या ठिकाणच्या दुकानावर दरोडा टाकला असल्याची माहीती बातमीदाराकडुन मिळाली होती, सदर बातमीबाबत गुन्हे शाखेच्या युनिट-२ च्या पथकाने खात्री केल्यानंतर पोलीस उप आयुक्त श्री पंकज डहाणे /सहा पोलीस आयुक्त श्री समीर शेख यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वडगाव शेरी व हडपसर या परिसरामध्ये राहणारे इसम नामे (१) अजय चद्रकांत त्रिपाठी वय ३४ वर्ष रा.मारुती शोरूम जवळ वडकी पुणे मुळ गाव बीरमउ मु.पो रका, तहसिल पटटी जिल्हा प्रतापगढ राज्य उत्तरप्रदेश (२) गौरीशंकर दिनेशकुमार त्रिपाठी वय ३० वर्ष रा.साईनाथनगर साईबाबा मदिराजवळ वडगाव शेरी पुणे मुळ गाव – ग्राम उचौली पोस्ट अमतामउ ता.मित्री थाना –मित्री जिल्हा – सितापुर उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कसुन तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली व आरोपी क्र १ हा २०१४ साली सी हॉक सेक्युरिटीमध्ये फिल्ड ऑफिसर म्हणुन कामास होता त्यावेळी त्याचे आळखीचा आरोपी क्र २ यास बोलावुन घेवुन सदर दोन्ही दुकानाची रेकी केली व त्यांनंतर उत्तरप्रदेश येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार त्यांचे साथीदार नामे १) अविनाश चंद्र श्रीकृष्ण त्रिपाटी रा.खटौली ता.रामसनईघाट जि.बाराबंकी उत्तरप्रदेश २) समशेरसिंग गुरूदयाळ सिंग रा.विलेशहापुर कोकण वाल्हे पो शामका ता चौक जि.लखनौ उत्तरप्रदेश ३) कमल किशोर ऊर्फ टिंकु कपाला रा.दिलाराम बारदरी ता.चौक जि लखनौ उत्तर प्रदेश ४) श्वेता गुप्ता ५) रवी गुप्ता रा.लखनौ यांना पिस्तुल व हत्यारासह पुणे येथे बोलावुन घेवुन त्यांचेमार्फत प्रथम सोनीगरा ज्वेलर्स येथ दरोडा घालुन ४० लाखाचे सोन्याचे दागीने चोरी केले होते व नंतर पी एम जी ॲन्ड ज्वेलर्स कोरेगाव पार्क याठिकाणी दरोडा घालुन १ कोटी ४२ लाखाचे हि-याचे व सोन्याचे दागीने दरोडा टाकुन चोरी केल्याची कबुली दिलेली आहे,

तसेच सदर गुन्हे करण्याकरिता आरोपी नामे अविनाश चंद्र श्रीकृष्ण त्रिपाठी व अजय चद्रकांत त्रिपाठी प्रथम खडक पोलीस स्टेशन हददीतुन शिवाजी रोड विठठल मंदीरासमोर मारुती ८०० नंबर एम एच १२ डब्ल्यु ३३७६ ही चोरी करून तिचा वापर सोनीगरा ज्वेलर्स येथे दरोडा टाकण्यासाठी वापर केला होता सदरचा गुन्हा केल्यानंतर सदरची गाडी ही साडेसतरा नळी हडपसर येथे नेवुन आरोपीनी पेटवुन दिली होती त्याबाबत खडक पोलीस स्टेशनला २९८/१४ भा द वि क ३७९ प्रमाणे दाखल आहे.

